महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-


कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ❖९ मार्च २०२५ ❖वर्ष ६ ❖अंक २५२❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# लाडक्या बहिणींना मिळणार 'रूपे कार्ड'

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई - केंद्र आणि राज्य शासनाच्या आर्थिक सहाय्याच्या योजनांमुळे बचत गटाच्या माध्यमातून महिला उद्यमशील बनत आहेत. यामुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था अधिक बळकट होत असल्याचे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले. जागतिक महिला दिनानिमित्त महिला व बालविकास विभागामार्फत 'बेटी बचाओ बेटी पढाओ' राज्यस्तरीय समारोप व कन्यारत्न यांचा सन्मान कार्यक्रमाचे आयोजन राजभवन येथे करण्यात आले होते त्यावेळी राज्यपाल बोलत होते. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, विभागाचे आयुक्त




नयना गुंडे, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे आयुक्त कैलास पगारे, महिला स्वयंसहाय्यता गटाच्या सदस्य आदी उपस्थित होते. राज्यपाल म्हणाले की, कुटुंबासह देशाच्या विकासासाठी महिलांचे योगदान महत्त्वाचे आहे. आज सन्मानित करण्यात आलेल्या महिला विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करीत आहेत. प्रधानमंत्री यांच्या निर्णयानुसार संरक्षण विभागाच्या तिन्ही दलांमध्ये महिलांना काम करण्याची संधी दिली आहे आणि तिथेही त्यांनी आपले अस्तित्व सिद्ध केले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे छायाचित्र असलेल्या 'रूपे कार्ड'चे अनावरण - यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेले 'रूपे कार्ड'चे अनावरण करण्यात आले. हे कार्ड 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजनेच्या लाभार्थ्यांना देण्यात येणार आहे. मल्टि मोडल ट्रान्सपोर्ट एक्सेस त्यात उपलब्ध आहे. याद्वारे डिजिटल सुरक्षितता आणि इन्शुरन्ससुद्धा मिळणार आहे. तसेच पेमेंट करण्यासाठी क्यूआर कोडही देण्यात आला आहे. या कार्डचे यावेळी अनावरण करण्यात आले. देशात 'रूपे कार्ड' देणारे महाराष्ट्र पहिले राज्य आहे. विकसित भारतासाठी महिलांचा सहभाग महत्त्वाचा - मुख्यमंत्री मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महिलांच्या योगदानाशिवाय देशाचा विकास होणे शक्य नाही. 2029 पर्यंत राजकीय क्षेत्रात मिळणाऱ्या आरक्षणामुळे महाराष्ट्र हे 'महिला राज्य' होणार आहे. 2047 मध्ये विकसित भारताचे उद्दिष्ट पूर्ण करताना महिलांचा सहभाग हा महत्त्वाचा ठरणार आहे. सामाजिक बंधनातून खडतर प्रवास करणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि ज्योतिबा फुले यांनी महिलांसाठी शिक्षणाची दारे खुली केली, विधवा पुनर्विवाह सुरू केले आणि महिलांसाठी केशवपन प्रथा बंद केली. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर उत्तम प्रशासक होत्या. छत्रपती शिवाजी महाराज घडविणाऱ्या राजमाता जिजाऊ होत्या अशा शक्तिरुपी स्त्रियांचा विचार आणि आदर्श घेऊन काम केल्यास प्रगती साध्य करता येईल. लोकसंख्येत ५० टक्के महिला असून, महिलांना केंद्रस्थानी ठेवून मानव संसाधन विकसित केल्यास देश विकसित होईल हे प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी ओळखले आणि म्हणूनच 'लेक लाडकी' ते 'बेटी बचाओ बेटी पढाओ', 'लखपती दीदी पर्यंत योजना सुरू करून त्या प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. 'बेटी बचाओ बेटी पढाओ' या योजनेमुळे राज्यातील अनेक जिल्ह्यातील बालविवाह बंद झाले आहेत आणि लिंगभेदाचे, भ्रूणहत्येचे प्रमाण कमी झाले आहे. मुख्यमंत्री म्हणाले की 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या लाभार्थी महिलांनी सुरू केलेल्या क्रेडिट सोसायटीचा विस्तार वाढवून उद्योगात आपले अस्तित्व मजबूत करायचे आहे असे सांगून मुख्यमंत्री यांनी महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

थोडक्यात महत्वाचे

## रायगड जिल्ह्यात घरकुलांचे महिलांच्या हस्ते भूमिपूजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : महिला दिनाचे औचित्य साधून रायगड जिल्ह्यात केंद्र आणि राज्य सरकार पुरस्कृत विविध घरकुल योजनेंतर्गत तब्बल २० हजार ४८९ घरकुलांचे भूमिपूजन ठिकठिकाणी महिलांच्या हस्ते करण्यात आले.

अलिबाग पंचायत समितीमार्फत वाडगांव आदिवासी वाडी येथे पंतप्रधान जनजाती आदिवासी न्यास अभियान मार्फत पी.एम. जन मन योजने अंतर्गत १९ घरकुलांचे भूमिपूजन सोहळा जिल्हाधिकारी किशन जावळे आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या उपस्थितीत पार पडला.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपवनसंरक्षक राहूल पाटील, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, गटविकास अधिकारी दाजी दाईंगडे, वाडगांव ग्रामपंचायत सरपंच सारिका पवार आणि उपसरपंच जयेंद्र भगत उपस्थित होते.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी घरकुलांची कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना दिल्या. तसेच, वाडगांव गाव स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याबरोबरच, एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला १०० टक्के कर वसुली पूर्ण करणारी ग्रामपंचायत आहे असे म्हणाले. गावातील शिक्षणाचा स्तर उंचावण्यासाठी निरक्षरांसाठी विशेष वर्ग सुरू करून वाडगांव १०० टक्के साक्षर करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

महिलांच्या हस्ते एवढ्या मोठ्या प्रमाणात घरकुलांचे भूमिपूजन करण्याचा हा उपक्रम राज्यात पहिल्यांदाच राबवला जात असल्याचे डॉ. भरत बास्टेवाड यांनी सांगितले. ३१ मार्चपर्यंत वाडगांव आदिवासी वाडीतील १९ घरकुलांची कामे पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त करत, सर्व संबंधित विभागांनी वेळेत कामे पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी दिले.

## राज्यातील होर्डिंग्जचे दरवर्षी ऑडिट होणार

### - उद्योग मंत्री उदय सामंत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई :- राज्यातील आणि मुंबईतील धोकादायक असणारी एक लाख ९ हजार ३८७ होर्डिंग आतापर्यंत काढून टाकण्यात आली असून राज्याच्या होर्डिंग धोरणामध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. मुंबईतील घाटकोपर परिसरात होर्डिंग पडून दुर्दैवी घटना घडली. अशा घटना राज्यात घडू नयेत यासाठी अधिकृत आणि अनधिकृत सर्व होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट सर्व महानगरपालिका आणि नगरपालिकेकडून करण्यात येणार असल्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

याबाबतचा प्रश्न सदस्य योगेश सागर यांनी उपस्थित केला होता. यावेळी सदस्य विजय वडेट्टीवार, अमित साटम, जितेंद्र आव्हाड, सुभाष देशमुख, चेतन तुपे, वरूण सरदेसाई यांनी उपप्रश्न उपस्थित केला. उद्योग मंत्री श्री. सामंत म्हणाले, राज्यातील महानगरपालिकेत बृहन्मुंबई महानगरपालिका व नगरपरिषद, नगरपंचायती क्षेत्राकरिता वेगवेगळे जाहिरात धोरण निर्गमित करण्यात आले आहे. घाटकोपर दुर्घटनेनंतर या नियमावलीचे काटेकोर पालन करण्याबाबत तसेच अनधिकृत होर्डिंग काढून टाकण्याची कार्यवाही तात्काळ करण्याबाबत सूचना सर्व महानगरपालिका व नगरपरिषद, नगरपंचायतींना देण्यात आली आहे. तसेच अनधिकृत होर्डिंग, उंच लोखंडी मनोरे, मोबाईल टॉवर, लोखंडी कार पार्किंग मनोरे इत्यादीचे संरचनात्मक लेखापरीक्षण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

राज्यात एकूण ९ हजार २६ ठिकाणी होर्डिंग्जचे ऑडिट करण्यात आले आहे. राज्यात १ लाख ९ हजार ३८७ होर्डिंग्ज काढून टाकण्यात आले आहेत, याप्रकरणी ज्यांनी सहकार्य केले नाही त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. असे एकूण ५९ गुन्हे दाखल झाले आहेत. महापालिका क्षेत्रात ४८ गुन्हे तर नगरपालिका क्षेत्रात ११ गुन्हे दाखल करण्यात आले असल्याचे श्री. सामंत यांनी यावेळी सांगितले

यावेळी राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या, सगळ्या महानगरपालिका आणि नगरपरिषदांना स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश दिले आहेत. यानंतर सगळ्या महानगरपालिकांचे ऑडिट रिपोर्ट आलेले आहेत.

# न्यायालयाच्या उद्घाटनाचे अनधिकृत बॅनर झळकले

## न्यायाधीशांनी उपमुख्यमंत्र्यांसमोर सर्वांना सुनावले

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मिरा-भाईंदर शहरातील दिवाणी न्यायालयाचे उद्घाटन आज, शनिवारी करण्यात आले. या प्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची प्रमुख उपस्थित होती. या कार्यक्रमात न्या. ओक यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा संदर्भ देत उपमुख्यमंत्र्यांसमोर सर्वांनाच कायद्याचे धडे दिले. न्या. अभय ओक म्हणाले, न्यायालयाच्या उद्घाटनासाठी ठाण्यावरून येत असताना रस्त्याच्या दोन्ही बाजूला मोठे बॅनर लागले होते. हे बॅनर पाहून मला आनंद झाला. आज मीरा-भाईंदरच्या न्यायालयाचे उद्घाटन होत आहे. एकूणच न्यायालयाला खूप महत्त्व दिले जाते, मोठे मोठे बॅनर लावले जातात. याच मला खूप आनंद झाला. पण, हा आनंद काही काळच टिकला. कारण, मुंबई उच्च न्यायालयाच्या एका निर्णयानुसार पालिकेची कोणतीही परवानगी घेतल्याशिवाय कुठेही फलक लावले जात नाही. त्या फलकावर जर त्या परवानगीचा क्रमांक नसेल तर तो बेकायदेशीर असून पालिकेने ताबडतोब काढला पाहिजे. माझा आनंद थोडा काळ टिकला याचे कारण असे आहे की कोणत्याही फलकावर परवाना क्रमांक नव्हता, अशा शब्दांत त्यांनी सर्वांना सुनावले. न्या. ओक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या चार न्यायाधिशांसमोरच स्पष्ट शब्दात नाराजी व्यक्त केली. त्यांच्या या भाषणाची सर्वत्र चर्चा होत आहे. दरम्यान, पालिका प्रशासनाच्या कारभारावर त्यांनी थेट बोट ठेवल्याने कोणती कारवाई केली जाते याकडे लक्ष वेधले आहे.



# २७ गावांच्या स्वतंत्र पाणीपुरवठा योजनेसाठी अतिरिक्त २५० कोटींची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या २७ गावांसाठी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेला अधिक गती देण्यासाठी आणि काम उत्तम दर्जाचे व्हावे यासाठी कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी वाढीव २५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. याबाबत खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांची राज्याचे नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता यांच्यासमवेत शुक्रवारी मंत्रालयात बैठक पार पडली. यावेळी केडीएमसी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, आमदार राजेश मोरे



यांच्यासह इतर पदाधिकारी आणि अधिकारी वर्ग उपस्थित होते.

कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या सातत्याच्या पाठपुराव्यामुळे २७ गावांचा कल्याण डोंबिवली महापालिकेत समाविष्ट करण्यात आला. यानंतर येथील ग्रामपंचायतींमध्ये काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांचा देखील महापालिकेत समावेश करत त्यांना मोठा दिलासा देण्यात आला. याच पार्श्वभूमीवर आता २७ गावांतील नागरिकांचा पाण्याचा प्रश्न कायम स्वरुपी मार्गी लागावा यासाठी

### खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांची नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांसमवेत मंत्रालयात बैठक

स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या माध्यमातून २७ गावातील नागरिकांना घरोघरी मुबलक पाणी पुरवठा होणार आहे.

या योजनेची कामे अधिक जलदगतीने व्हावी यासाठी खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी राज्याच्या नगरविकास विभागाकडे २५० कोटी रुपयांच्या वाढीव निधीची मागणी केली. याबाबत कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांची नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता यांच्या समवेत मंत्रालयात आढवा बैठक पार पडली. याबैठकी दरम्यान पाणी पुरवठा योजना जलदगतीने राबविण्यात यावी याबाबत चर्चा करण्यात आली.

राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम योजनेअंतर्गत कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात बायोरेमेडिएशन पद्धतीने घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविण्याचे नियोजित करण्यात येत आहे. सुमारे ७८ कोटी रुपयांचा निधी तून या प्रकल्पाची उभारणी करण्यात येणार आहे. याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. २७ गावे कल्याण डोंबिवली महानगरपालिका हददीत समावेश झाल्यामुळे स्थानिक संस्था करापोटी वाढीव अनुदान देण्यात यावे. २०२३-२०२४ व २०२४-२०२५ कालावधीतील कल्याण डॉविबली मनपा हददीतील प्राप्त झालेल्या १ टक्के मुद्रांक शुल्क अधिभार रक्कम महापालिकेला देण्यात यावी. डोंबिवली मोठागाव ठाकुर्ली येथील दिवा-वसई रेल्वे मार्गावरील फाटक क्रमांक १ ऐवजी प्रस्तावीत चौपदरी उड्डाणपुलाबाबत अर्थातच डोंबिवली मोठागाव ठाकुर्ली रेल्वे पुलाबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. यासाठी वाढीव निधी देण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली.

# खडवली येथील महाआरोग्य शिबीरात हजारो नागरिकांचा सहभाग

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा, जिल्हा परिषद ठाणे, पंचायत समिती कल्याण. महाआरोग्य शिबीर आयोजित करणे, या योजनेअंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र खडवली येथे तालुका स्तरावरील महाआरोग्य शिबीराचे आयोजन नुकतेच करण्यात आले आहे, या शिबीरात परिसरातील हजारो नागरिकांनी आरोग्य तपासणी करत याचा लाभ घेतला. प्रथम अनुदानित आश्रम शाळा खडवली विद्यार्थ्यीनीनी स्वागत गीत सादर करत पाहुण्याचे स्वागत केले, यानंतर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली, दरम्यान सकाळपासून विविध तज्ञ डॉंक्टर परिसरातील नागरिकांची आरोग्य




तपासणी करत होते, यामध्ये डॉ हिरामण साबळे(फिजिशियन)डॉ श्याम राठोड(बालरोगतज्ज्ञ) डॉ स्वाती मासाळ(बालरोगतज्ज्ञ)डॉ रवींद्र तांबे(मानोसोपचार तज्ञ)डॉ प्रशांत जावरे(त्वचारोग तज्ञ)डॉ अमोल अग्रवाल(दंत शल्यचिकित्सक) डॉ प्रिया गवळी(स्त्रीरोगतज्ज्ञ)डॉ दिलराज कडलस(न्यूरोसर्जन)डॉ समीर शेलवले(अस्थिरोग तज्ञ)डॉ वैभव किरपण(नाक, कान, घसा तज्ञ) इत्यादींचा समावेश होता, विशेष म्हणजे एकाच ठिकाणी ऐवढे सगळे वैद्यकीय तज्ञ उपलब्ध झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले, या सर्व डॉक्टरांचा कल्याण पंचायत समितीच्या आरोग्य विभागाच्या वतीने गौरव करण्यात आला. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ दिनेश सुतार यांनी या शिबीराच्या आयोजना मागील उद्देश, हेतू सांगितला. तर तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ भारत मासाळ यांनी सांगितले की, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, व गटविकास अधिकारी संजय भोये यांच्या संकल्पनेतून हे महाआरोग्य शिबीर आयोजित करण्यात आल्याचे सांगून, आज महिला दिनानिमित्त महिला व पुरुषासाठी हे शिबीर असल्याचे सांगितले, यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र खडवली, दहागांव गेली८दिवसापासून प्रयत्न करत असल्याचे सांगितले. तर गटविकास अधिकारी संजय भोये, कृषी अधिकारी बाबासाहेब शिंदे यांनी या शिबीराचे कौतुक केले. व याचा नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमासाठी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ दिनेश सुतार, कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ भारत मासाळ, कृषी अधिकारी बाबासाहेब शिंदे, विस्तार अधिकारी श्री भोसले, खडवली ग्रामपंचायतीच्या सरपंच ,सदस्य, गेरसे, नडगाव चे सरपंच, आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात सुमारे५७५नागरिकांना लाभ घेतला. हे महाआरोग्य शिबीर यशस्वी होण्यासाठी खडवली प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉ ,गिता कदम, डॉ, महेश जाधव, आरोग्य सेवक, शिस्टर, आशा कार्यकर्ती, शिपाई आदी कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

## गीतासार



**ज्ञानकर्मसंन्यासयोगः**

दैवमेवापरे यज्ञं योगिनः पर्युपासते । ब्रह्माग्नावपरे यज्ञं यज्ञेनैवोपजुह्वति ॥ ४-२५ ॥

दुसरे काही योगी देवपूजारूप यज्ञाचे उत्तम प्रकारे अनुष्ठान करतात. तर इतर योगी परब्रह्म परमात्मारूपी अग्नीत अभेददर्शनरूप यज्ञाच्या द्वारेच आत्मारूप यज्ञाचे हवन करतात. ॥ ४-२५ ॥

श्रोत्रादीनीन्द्रियाण्यन्ये संयमाग्निषु जुह्वति । शब्दादीन्विषयानन्य इन्द्रियाग्निषु जुह्वति ॥ ४-२६ ॥

दुसरे काही योगी कान इत्यादी इंद्रियांचे संयमरूप अग्नीत हवन करतात तर इतर योगी शब्द इत्यादी सर्व विषयांचे इंद्रियरूप अग्नीत हवन करतात. ॥ ४-२६ ॥

सर्वाणीन्द्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे । आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते ॥ ४-२७ ॥

अन्य योगी इंद्रियांच्या सर्व क्रिया आणि प्राणांच्या सर्व क्रिया यांचे ज्ञानाने प्रकाशित जो आत्मसंयमयोगरूपी अग्नी त्यात हवन करतात. ॥ ४-२७ ॥

द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथापरे । स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः ॥ ४-२८ ॥

काही मनुष्य द्रव्यविषयक यज्ञ करणारे असतात, काहीजण तपश्चर्यारूप यज्ञ करणारे असतात. तसेच दुसरे काहीजण योगरूप यज्ञ करणारे असतात. अहिंसा इत्यादी कडकव्रते पाळणारे कितीतरी यत्नशील मनुष्य स्वाध्यायरूप ज्ञानयज्ञ करणारे असतात. ॥ ४-२८ ॥

## सौंदर्य टिप्स

### टोमॅटोचा ठेचा





**साहित्य**

हिरवे टोमॅटो ४-५, हिरव्या मिरच्या १०-१५, लसूण पाकळ्या १०-१५ ,भाजलेले शेंगदाणे १/४ वाटी ,जिरे १ चमचा, मीठ - चवीनुसार ,कोथिंबीर १/४ वाटी ,तेल २ चमचे ,सुकी मिरची २-३, हिंग १/४ चमचा, ७-८ पाकळ्या ठेचलेला लसूण, भिजवलेली चना डाळ १/२ वाटी

**कृती**

1. सगळयात आधी टोमॅटोच्या चकत्या कापून घ्या. त्यानंतर तव्यावर दीड चमचा तेल घालून गरम करा. यामध्ये गोल कापलेल्या टोमॅटोच्या चकत्या भाजून घ्या.
2. दोन्ही बाजूने टोमॅटोच्या चकत्या भाजल्या की, ताटात काढून घ्या. त्यानंतर तव्यावर शेंगदाणे भाजून घ्या.
3. तव्यावर तेल टाकून त्यात लसूण, हिरव्या मिरच्या, जिरे आणि मीठ घालून भाजून घ्या. यानंतर भिजवलेली चणाडाळ आणि मीठ कोरडी होईपर्यंत भाजून घ्या.
4. भाजलेल सर्व साहित्य मिक्सरच्या भांड्यात जाडसर वाटून घ्या. त्यानंतर मिक्सरच्या भांड्यात कोथिंबीर आणि भाजलेल्या टोमॅटोच्या चकत्या पाणी न घालता जाडसर वाटून घ्या.
5. त्यानंतर फोडणीसाठी तेलात हिंग, ठेचलेला लसूण, लाल सुक्या मिरचीचा तडका तयार करा. तयार झालेल्या ठेच्यावर हा तडका मिक्स करा.
6. तयार होईल कच्च्या टोमॅटोच्या झणझणीत ठेचा. भाकरी-भातासोबत खा...

# समाज तभी होगा महान जब नारी का होगा सन्मान



स्त्री म्हणजे मातृत्वाचा झरा. स्त्री म्हणजे वात्सल्याचं प्रतिक अन् स्त्री म्हणजे त्यागाची मूर्तिमंत देवताच होय. स्त्री ही दोन विभिन्न कुटुंबातील सेतू असून, ती प्रत्येक युगात सातत्याने कुटुंबासाठी चंदनासारखं झिजत असते. स्त्री ही, कन्या, बहीण, पत्नी, माता अशा विविध भूमिकेतून कुटुंबाच्या उन्नतीकरिता आपलं भरीव योगदान देत असते. एवढं करूनही तिला कौटुंबिक व सामाजिक जीवनात अनेक समस्या अन् शारीरिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते. हे सर्व घाव सहनशिलतेने सोसून हतबल न होता, ती आपली पुढील यशस्वी वाटचाल करत असते, याचा आम्हा पुरुषवर्गाला सार्थ अभिमान आहे. यास्तव जागतिक महिला दिनानिमित्त माता-भगिनींना त्रिवार मानाचा मुजरा!

मित्रहो, 8 मार्च हा दिवस वैश्विक स्तरावर जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. 20 व्या शतकाच्या सुरुवातीपासून अमेरिका, युरोप, ब्रिटन, जर्मनी, भारत या देशांमध्ये स्त्री-पुरुष समानता, स्त्रियांना मतदानाचा अधिकार देणं, पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना वर्किंग आवर्स कमी देणं, वेतनवाढ, नोकरीच्या ठिकाणी महिलांना संरक्षण आदी मागण्यांसाठी विविध महिला संघटनांकडून आंदोलने झाली, मोर्चे निघाले. यातूनच महिलांच्या सन्मानासाठी अन् हक्कांसाठी सर्वानुमते 8 मार्च हा दिवस "जागतिक महिला दिन" म्हणून साजरा करण्याचे ठरले. 1975 मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने 8 मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्या पार्श्वभूमीवर आज सर्वत्र महिला दिन मोठ्या हर्षोल्हासात साजरा होत आहे.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज हे स्त्री महात्म्याविषयी म्हणतात, "स्त्री ही मराठ्यांच्या देव्हाऱ्यातली देवता आहे. स्त्री मग ती शत्रूच्या मुलखातली जरी असली, तरी ती मातेसमान असते. म्हणून तिचा यथेच्छ सन्मान झालाच पाहिजे." मानवी जीवनात स्त्रीचे महत्व अनन्यसाधारण असते. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांना लोकहितवादी व आदर्श राजा घडविण्यात त्यांच्या आईसाहेब राजमाता जिजाऊ यांनी अविश्रांत परिश्रम घेतले. अर्थातच शिवबाला युद्धनीतीचे प्रशिक्षण देण्यापासून तर राज्याभिषेक करण्यापर्यंत त्या आयुष्यभर झटल्या. अशा थोर माँ जिजाऊंना जागतिक महिला दिनानिमित्त त्रिवार मानाचा मुजरा..! यत्र नार्यस्तू पुज्यन्ते..! रमन्ते तत्र देवताः..!!

1857 च्या पहिल्या स्वातंत्र्य लढ्यात आपल्या असामान्य शौर्याने झांसीची राणी लक्ष्मीबाई ह्या भारतीय इतिहासात अजरामर झाल्या. इंग्रज गव्हर्नर डलहौसीला "मेरी झांसी नही दूंगी" असा सज्जड इशारा देत भारतभूमीच्या रक्षणार्थ तिने आपल्या प्राणाची आहुती दिली. त्यांनाही या मंगलमय दिनी आम्ही त्रिवार वंदन करतो. आजच्या महिला दिनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची आठवण येणं स्वाभाविक आहे. वैधव्याच्या दुःखाने अन् पुत्रशोकाने हतबल न होता मोठ्या धैर्याने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी होळकरांचे राज्य चालविले. प्रजाहितदक्ष राज्यकर्ती म्हणून रयतेत ओळख असलेल्या अहिल्याबाईंनी सर्वधर्मसमभाव या तत्त्वाचा अंगिकार करून तब्बल 28 वर्षे यशस्वीपणे होळकरांचा राज्यकारभार चालविला. आजच्या जागतिक महिला दिनी त्यांना आम्ही मराठीजन दंडवत प्रणाम करतो.

पारतंत्र्याच्या काळात म्हणजेच 19 व्या शतकाच्या मध्याला जेव्हा स्त्री शिक्षणापासून पूर्णतः वंचित होती. तिला चूल अन् मुल या चौकटीतच रहावं लागायचं. त्या कालखंडात स्त्रीला शिक्षण घेणं वर्ज्य होतं. अशा वेळी स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी तथाकथित समाजाचे बंधनं झुगारून फुले दाम्पत्य पुढे आलं. त्यांनी पुण्यात भिडेंच्या वाड्यात दि.1 जानेवारी 1848 रोजी मुलींची शाळा सुरू करून स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ केली अन् ही शाळा देशातील पहिली मुलींची शाळा गणली गेली. सावित्रीबाई फुले ह्या पारतंत्र्याच्या काळातल्या पहिल्या महिला शिक्षिका म्हटल्या गेल्या. आईच्या महानतेसंदर्भात सावित्रीबाई म्हणतात, जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी. तत्कालीन कर्मकांडी समाजाचा विरोध अन् जाचक छळ सोसून सावित्रीबाई फुलेंनी स्त्री शिक्षणाची बीजे रोवली. आज त्यांच्या पुण्याईमुळे 21 व्या शतकातल्या सावित्रीच्या लेकी ह्या शिकून सवरून विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, राजकारण, समाजकारण, माहिती तंत्रज्ञान, साहित्य, कला, सिनेसृष्टी, उद्योग, बँकिंग, क्रीडा, विधी व न्याय, वैद्यकीय, पत्रकारिता, इलेक्ट्रॉनिक मीडिया, संरक्षण, प्रशासन, अंतराळ या क्षेत्रांत आघाडी घेताना दिसत आहेत. स्त्री शिक्षणातील त्यांच्या महान कामगिरीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने कृतज्ञतेच्या भावनेतून सावित्रीबाई फुले यांचे नाव पुणे विद्यापीठाला दिलं. वास्तवात हीच त्यांच्या कार्याची खरी पावती होय. अतः स्त्री शक्तीला त्रिवार मानाचा मुजरा!

भारतातील प्रत्येक जिल्ह्यात अन् खेड्यापाड्यात परिचित असलेला शालीन चेहरा म्हणजे प्रियदर्शिनी इंदिरा गांधी. स्व.इंदिरा गांधी ह्या आपल्या स्वकर्तुत्वाने भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून गणल्या गेल्या. इतकेच नव्हे तर, जगातील 120 तटस्थ राष्ट्रांच्या संघटनेच्या त्या अध्यक्ष बनून जागतिक कीर्तीच्या नेत्या म्हटल्या गेल्या. त्यांच्या प्रभावी व कणखर अशा राजकीय भूमिकेमुळे भारताला सातासमुद्रापार नावलौकिक मिळाला. इंदिरा गांधींना आम्ही सर्वधर्मीय नागरिक आजच्या शुभ दिनी विनम्र अभिवादन करतो.

स्त्री ही प्रत्येक युगात सर्वश्रेष्ठ मानली गेली आहे. म्हणूनच तिचं नाव अग्रक्रमी घेतलं जातं. उदा. लक्ष्मीनारायण, सीताराम, राधेश्याम..! श्री गजाननाची मातोश्री मां पार्वती, प्रभु रामाची मातोश्री माता कौशल्या, श्री बजरंगबलीची माता अंजलीदेवी, भगवान श्रीकृष्णाच्या मातोश्री देवकी व यशोदा या सर्वांच्या संस्कारांमुळे अन् शिकवणीमुळे त्यांच्या सुपुत्रांनी आपले नाव साऱ्या त्रिलोकात अजरामर केलं. ही आहे खरी आईची महिमा! अशा महान देवीमातांना आम्ही साष्टांग नमन करतो.

भारताच्या राष्ट्रपती आदरणीय द्रौपदी मुर्मू अन् माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांना जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आम्ही मराठी भूमीपुत्र त्रिवार मानाचा मुजरा करतो. तथाकथित समाजाकडून स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध काव्याच्या माध्यमातून आवाज उठविणाऱ्या अहिराणी भाषेच्या खानदेशी कवियत्री बहिणाबाई चौधरी यांनाही महिला दिनानिमित्त भावपूर्ण नमन!

घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. राज्यकर्त्यांनी स्त्रियांना राजकारणात अधिकाधिक प्रतिनिधित्व द्यावं, असं त्यांनी आवाहन केलं. भारतीय लोकशाही मजबूत व प्रभावी करण्यासाठी स्त्रियांचा राजकीय क्षेत्रात सक्रिय सहभाग असायला पाहिजे, असे त्यांचे ठाम मत होते. मनूस्मृतीने स्त्रियांचे जीवन चूल अन् मूल या चौकटीत बंदिस्त केलं होतं. त्यांना शिक्षणापासून कोसो दूर ठेवलं. त्यांना गुलामासारखी वागणूक देऊन, भोग वस्तू म्हणून हिणवले. या सर्व अमानवीय गोष्टींमुळे डॉ.बाबासाहेबांचे मन खिन्न झालं होतं. त्यांनी याचा तीव्र विरोध करीत, मनुस्मृतीची जाहीर होळी केली. अशा महान लोकहितवादी युगपुरुषाला जन्म देणाऱ्या त्यांच्या मातोश्री भीमाबाई आंबेडकर तसेच त्यांना जीवनातल्या सुख-दुःखात मोलाची साथ देणाऱ्या त्यांच्या पत्नी रमाबाई आंबेडकर आणि माईसाहेब सविता आंबेडकर यांना जागतिक महिला दिनानिमित्त आम्ही विनम्र अभिवादन करतो.

लेखक
रणवीर राजपूत, ठाणे
निवृत्त जिल्हा माहिती अधिकारी

स्त्री शिक्षणाला कर्मकांडी समाजाकडून तीव्र विरोध होत असताना, ठाणे जिल्ह्यातील कल्याणची सुकन्या स्व.डॉ.आनंदीबाई जोशी यांनी तत्कालीन समाजाची बंधने झुगारून, उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत जाऊन एम.डी. ही वैद्यकीय क्षेत्रातील उच्च पदवी संपादन केली. विशेष म्हणजे आनंदीबाई ह्या विदेशात शिकून पारतंत्र्यात डॉक्टर होणाऱ्या भारतातल्या पहिल्या महिला डॉक्टर म्हणून गणल्या गेल्या. त्यांनी आपल्या वैद्यकीय ज्ञानाचा उपयोग समाजातील गोरगरिब, निराधार, निर्धन महिलांच्या आरोग्य संवर्धनासाठी केला. महत्वाचे म्हणजे महिला डॉक्टरांसाठी पिढ्यान-पिढ्या डॉ.आनंदीबाई जोशी ह्या रोल मॉडेल म्हणून राहतील. महिला दिनानिमित्त डॉ.आनंदीबाई जोशी यांना आम्ही मराठीजन साष्टांग नमन करतो.

भारताला स्वातंत्र्य प्राप्तीसाठी योगदान देणाऱ्या थोर महिला सरोजिनी नायडू, अरुणा असफअली, उषा मेहता, मॅडम भिकाजी कामा, कस्तुरबा गांधी, बेगम हजरत महल, कमला नेहरू, अँनी बेझंट, विजया लक्ष्मी पंडित या ज्येष्ठ-श्रेष्ठ महिलांना आजच्या मंगलमय दिनी हार्दिक शुभेच्छा. नंदुरबारचे बाल क्रांतीकारक शिरीषकुमार मेहता ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणाची आहुती दिली, अशा महान क्रांतिवीराच्या मातोश्री स्व.सविताबेन पुष्पेंद्र मेहता यांना महिला दिनानिमित्त विनम्र अभिवादन!

जगविख्यात गायिका, स्वरसम्राज्ञी, भारतरत्न स्व.लता मंगेशकर यांनी आपल्या कारकिर्दीमध्ये विविध भाषेत सुमारे 30 हजारहून अधिक गीते गाऊन विश्वविक्रम केला. यास्तव त्यांना भारतीयांच्या हृदयात चिरकाल मानाचं स्थान राहिलं आहे. यास्तव स्व.लताजींना महिला दिनानिमित्त भावपूर्ण नमन!

गोरगरीब, अबला, निराधार जनतेची निःस्पृह भावनेने सेवा करून त्यांना मायेचा ओलावा दिला, याबद्दल भारत सरकारने मदर तेरेसा यांना भारतरत्न हा सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन सन्मानित केलं, त्यांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा. प्रख्यात गायिका आशा भोसले, अनुराधा पौडवाल, श्रेया घोषाळ, सुनिती चौहान, वैशाली सामंत, आर्या आंबेकर आदी ख्यातनाम गायिका आणि सिने अभिनेत्री वहिदा रेहमान, हेमा मालिनी, शबाना आजमी, आशा पारेख, माधुरी दीक्षित, रश्मिका मंदाना, सई ताम्हणकर, अलका कुबल, सोनाली कुलकर्णी आदी अभिनेत्रींना महिला दिनानिमित्त शुभेच्छा! आपणा सर्वांना दीर्घायुष्य लाभो! न्यायदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या सन्माननीय न्यायमूर्ती जे.फातिमा बीवी, न्या.भानुमती, न्या.इंदू मल्होत्रा, न्या.इंदिरा बॅनर्जी, न्या.सुजाता मेहता, न्या.रंजना देसाई आदी मा.न्यायाधीश महिलांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा. आपणास आरोग्यदायी असं दीर्घायुष्य लाभो, हीच सदिच्छा!

समाजकार्यात आपलं सर्वस्व पणाला लावणाऱ्या मेधा पाटकर, स्व.सिंधुताई सपकाळ, मंदाकिनी आमटे, राणी बंग, किरण बेदी आदींना महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा. आपणास उदंड आयुष्य लाभो.

उद्योग जगतात भारताचे नाव अजरामर करणाऱ्या निता अंबानी, फाल्गुनी नायर, निस शर्मा, राधिका घाई अग्रवाल, रीचा कर, उपासना टाकू, वंदना लुथरा, सबिना चोप्रा, सायरी चहल, श्रद्धा धर्मा, सूची मुकर्जी, विणा पाटील आदी प्रख्यात उद्योजक महिलांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा. ख्यातनाम महिला पायलट सरला ठकराल, स्व.कल्पना चावला, सुनीता विल्यम्स यांना तसेच राजकीय-सामाजिक क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या सुप्रिया सुळे, स्मृती इराणी, निलम गोऱ्हे, पंकजा मुंडे, जया बच्चन, ममता बॅनर्जी, नवनीत राणा, पूनम महाजन, मीनाक्षी शिंदे, पल्लवी कदम आदी कर्तबगार भगिनींना जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

प्रशासकीय सेवेत आपल्या कर्तबगारीची छाप पाडणाऱ्या सुजाता सौनिक, मनिषा म्हैसकर, मेधा गाडगीळ, मनीषा वर्मा, वत्सला नायर-सिंह, विनिता सिंघल, वंदना कृष्णा यांना महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा. त्याचप्रमाणे क्रीडा क्षेत्रात देशाला नावलौकिक मिळवून देणाऱ्या मेरी कॉम, सायना नेहवाल, राही सरनोबत, सानिया मिर्झा आदींना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा साहित्य-कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दुर्गा भागवत, विजया वाड, अरूणा ढेरे, विजया राजाध्यक्ष, शांता शेळके आदींना महिला दिनानिमित्त खूप खूप शुभेच्छा!

दैनंदिन जीवनात कधी कधी विद्यार्थिनी एवं महिलांवर विविध प्रकारे हल्ले, अपहरण वा दुष्कृत्ये होत असल्याच्या घटना घडत असतात, याचे वाईट वाटते. त्यावर रामबाण उपाय म्हणून मुलींसाठी शालेय जीवनापासूनच स्वरक्षणार्थ मार्शल आर्टचे प्रशिक्षण सक्तीचे करावे. जेणेकरून वेळप्रसंगी त्या आपला बचाव स्वतः करू शकतील. याशिवाय केंद्र अन् राज्य सरकारने देखील शाळा/कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनी तथा महिलांचे असामाजिक तत्वांपासून बचाव/रक्षण होण्यासंदर्भात ठोस कायदेशीर उपाययोजना कराव्यात, जेणेकरून त्या निर्भयपणे आपलं जीवन व्यतित करू शकतील.

मित्रहो, 21 व्या शतकात भारतीय महिला आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर विविध क्षेत्रात उंच भरारी घेताना दिसताहेत. त्यातून तिने स्त्री ही अबला नसून सबला आहे, हे प्रत्यक्ष कृतीने सिद्ध करून दाखविले आहे. मुलींनी खूप खूप शिकावं अन् आपल्या कुटुंबाचा व राज्यासह देशाचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी खारीचा वाटा उचलावा. महत्वाचे म्हणजे आधुनिक जगतात चूल अन् मूल ही संकल्पना कालबाह्य झाल्याने पालकांनी आता बेटी पढाव, बेटी बचाव हे कृतीने सिद्धीस आणावे, म्हणजे महिला दिन साजरा करणे खऱ्या अर्थाने सार्थक होईल. तमाम सावित्रीच्या लेकींना जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

जय नारी शक्ती!

# संकल्प महिलांना आर्थिक सक्षम करण्याचा


८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. आपल्या देशातही हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. आजच्या दिवशी वेगवेगळ्या क्षेत्रात स्वतःचा ठसा उमटवणाऱ्या महिलांचा गौरव केला जातो. सर्वच क्षेत्रात महिला आज पुरुषांच्या बरोबरीने काम करीत आहेत. असे कोणतेही क्षेत्र नाही की ज्यात महिला पुरुषांच्या मागे आहेत. राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा, साहित्य,विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, उद्योग अशा सर्वच क्षेत्रात महिला आपल्या कर्तृत्वाचा झेंडा रोवताना दिसत आहे. पूर्वी चूल आणि मूल ही जी महिलांची ओळख होती ती आता पुसली गेली आहे. मागील शतकात किंवा अगदी काही दशकांपूर्वी म्हटले तरी चालेल महिला सक्षम नव्हत्या. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे महिला कायम दुर्लक्षित होत्या. सावित्रीबाई फुले यांच्यामुळे महिलांनी पहिल्यांदा घराचा उंबरठा ओलांडला. शिक्षणामुळे महिला स्वतःच्या पायावर उभ्या राहू लागल्या. शिक्षणामुळेच महिला सक्षम झाल्या असे असले तरी आजही देशातील महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत का ? असा प्रश्न खेदाने विचारावा वाटतो. आज सर्वच क्षेत्रात महिला पुढे असल्या तरी त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम नाहीत असे म्हणावे लागेल. आज खाजगी तसेच शासकीय नोकऱ्यांमध्ये महिलांचे प्रमाण खूप आहे. अनेक महिला उच्चपदावर कार्यरत आहेत. असे असले तरी नोकरी करणाऱ्या महिलांचा त्यांच्या पगारावर कितपत अधिकार आहे हा संशोधनाचा विषय आहे. नोकरी करणाऱ्या महिलांना स्वतःचा पैसा स्वतः खर्च करण्याचा अधिकार नाही. आपल्या देशातील सर्वाधिक महिला या घरकामात गुंतलेल्या असतात. त्यांना आर्थिकदृष्ट्या पतीवर अवलंबून राहावे लागते. या महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम नाहीत. समाजात माणूस म्हणून जगायचे असेल तर आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे आवश्यक आहे. मध्ययुगात स्त्री ही एक असहाय्य व्यक्तिमत्त्व की जिला स्वतःचे अस्तित्वच नाही, अशी



प्रतिमा समोर आली त्याला छेद देण्याचा प्रयत्न अजूनही चालू आहे. पुरुषप्रधान संस्कृती आल्यापासून पुषांच्या लेखी महिलांचा दर्जा दुय्यम होत गेला. वेतनासंबंधी भेदभाव, स्वयंरोजगार, अर्थसाहाय्याचा अभाव, विनावेतन काम व बेरोजगारी, कुटीर उद्योगात मालकी हक्क नसणे अशा अनेक कारणांमुळे महिलांचे आर्थिक स्थान पुरुषांपेक्षा दुय्यम राहिले आहे. आज २१ व्या शतकातही तो दुय्यमच आहे. हा दुय्यम दर्जा जाऊन महिलांना पुरुषांच्या बरोबरीने मानाचे स्थान मिळवून द्यायचे असेल तर त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावेच लागेल. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करायचे असेल तर महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्यायला हव्यात. महिला मंडळे, स्वयंसहाय्यता बचत गट, विविध संस्था यांच्या माध्यमातून महिलांनी एकत्र येऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, यासाठी समाजानेही व्यासपीठ उपलब्ध करुन द्यायला हवे. पुरुषांनीही आपली पुरुषी मानसिकता सोडून महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न करायला हवेत. महिलांच्या पगारावर महिलांचाच अधिकार असायला हवा. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करुनच आपण देश सक्षम करु शकतो. देशाचा विकास करायचा असेल तर महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करायलाच हवे.

- श्याम बसप्पा ठाणेदारदौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# स्त्री शक्तीचा जागर



जागतिक महिला दिन! हा दिवस म्हणजे स्त्री शक्तीचा गौरव करण्याचा, तिच्या कर्तृत्वाला सलाम करण्याचा दिवस आहे. अनादी काळापासून स्त्रीने आपल्या कर्तृत्वाने, त्यागाने आणि प्रेमाने जगाला नवी दिशा दिली आहे. आज आपण राजमाता जिजाऊ, कल्पना चावला, मदर टेरेसा, सावित्रीबाई फुले यांच्यासारख्या कर्तृत्वान महिलांचे स्मरण झाल्याशिवाय राहत नाही. त्यांनी आपल्या कार्यांनी समाजात मोलाचे योगदान दिले आहे. आज प्रत्येक क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत.

महिला म्हणजे केवळ शक्ती नाही, तर ती करुणा आणि प्रेमाचा झरा आहे. आजच्या काळात महिलांनी आपल्या हक्कांसाठी आणि सन्मानासाठी लढत आहे.दि.8 मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिन' महिलांच्या शक्तीच्या कार्याचा जागर करण्यासाठी हा दिवस असतो. हा दिवस लिंग समानता, हक्क आणि महिलांवरील हिंसा आणि अत्याचार यासारख्या मुद्यांवर लक्ष केंद्रित करतो. महिलांचा हक्क चळवळीतील केंद्रबिंदू म्हणून हा दिवस पाळला जातो.

या दिवशी विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सत्कार केला जातो. त्यांच्या कार्याचा गौरव केला जातो. महिला वर्गाला त्यांच्या स्वातंत्र्याची जाणीव होण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. स्त्री म्हणजे वासल्य, स्त्री म्हणजे मांगल्य, स्त्री म्हणजे मातृत्व, स्त्री म्हणजे कतृत्व, स्री म्हणजे प्रत्येक क्षणाची साथ, स्री म्हणजे प्रत्येक अडथळ्यावर मात करणारी माता.....।

"महिला अनेक क्षेत्रात प्रगती करत आहेत. अगदी कृषी क्षेत्रापासून अंतराळ क्षेत्रापर्यंत महिला आपलं कर्तृत्व सिद्ध करत आहेत, पण दुसरीकडे ग्रामीण भागात आणि निमशहरी भागातील महिलांना रोज अनेक समस्यांचा सामना करावा लागतोय. अशा परिस्थितीत महिलांचे सक्षमीकरण आणि सबलीकरणासाठी राज्य शासनामार्फत अनेक योजना राबवल्या जात आहेत. मुलींच्या जन्मापासून ते शिक्षण आणि विवाहानंतरही अनेक योजनांचा लाभ घेता येतो. दरवर्षी 8 मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा केला जातो. या महिला दिनानिमित्त आपण केंद्र शासन आणि राज्य शासनाच्यावतीने खास महिलांसाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांविषयी जाणून घेणार आहे. महिलांसाठी शासकीय योजना अशा आहेत:--महिला समृद्धी योजना, महिला उद्योग निधी योजना, महिला कॉयर योजना, जननी सुरक्षा योजना, सुकन्या समृद्धी योजना, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, माझी कन्या भाग्यश्री योजना, लेक लाडकी योजना, स्वर्णिमा योजना, महिला सन्मान योजना इ.योजना शासनाकडून महिलांसाठी राबविण्यात येत असून महिलांचे सक्षमीकरण आणि सबलीकरणासाठी राज्य शासनामार्फत अनेक योजना राबवल्या जात आहेत. मुलींच्या जन्मापासून ते शिक्षण आणि विवाहानंतरही अनेक योजनांचा लाभ घेता येतो. "बेटी बचाओ, बेटी पढाओ" स्रीभ्रुण हत्या रोखण्यासाठी पीसीपीएनडीटी अँक्ट तयार लागू करण्यात आला आहे. स्रीचे कुठेही सामाजिक शोषण होऊ नये यासाठी हा केंद्र बिंदू मानून संरक्षण करण्यात येते.

दरवर्षी 8 मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा केला जातो. या महिला दिनानिमित्त आपण केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या वतीने खास महिलांसाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांविषयी जनजागृतीपर व्याख्यान, उल्लेखनीय कामगिरी केलेल्या महिलांच्या मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येतो. सध्या मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना शासनातर्फे राबविण्यात येत आहे. त्याला सर्वत्र गरजू महिलांचा प्रतिसाद मिळत आहे. भारतासारख्या प्रगतीशील देशात महिलांनी राष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष, प्रधानमंत्री, अर्थमंत्री, मुख्यमंत्री तसेच शासकीय स्तरांवर,वैद्यकीय, विधी, संशोधन इ. आदी क्षेत्रात महत्त्वाची पदे भूषविली असून कार्यरत आहेत. 30 टक्के नोकरीत ठिकाणी आरक्षण देऊन महिलांचा सन्मान करण्यात आला आहे.

प्रत्येक मानवाने स्रीच्या पोटी जन्म घेतला असून स्रीच्या आर्थिक सामाजिक, शैक्षणिक, इ. शोषण कुठेही होऊ नये यासाठी शासनाने संरक्षणासाठी अनेक उपाययोजना केल्या आहेत. यासाठी समाजाच्याही तेवढाच पाठिंब्याची गरज आहे. समाजात प्रत्येक स्री आपल्या स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करत आहे. परिवाराच्या जबाबदारीचा हिस्सा बनू पाहत आहे. स्री ही आई ,बहिण ,पत्नी, मुलगी इ.असून सर्वच क्षेत्रात प्रगती करत आहे. पण आजही देशात शासकीय आकडेवारी नुसार माणसांच्या तुलनेने स्रीचे प्रमाण कमी आहे यासाठी "स्री संरक्षण" ही आपली सर्वाची सामाजिक जबाबदारी याचे पालन सर्वोतोपरी व्हावे, जेणेकरून स्री च्या संरक्षणात आपण कुठेही कमी पडणार नाही, याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे. महिला म्हणजे केवळ शक्ती नाही, तर ती करुणा आणि प्रेमाचा झरा आहे.

आज दि.8 मार्च जागतिक महिला दिनानिमित्त महिलांचे आर्थिक सामाजिक शोषण कुठेही होऊ नये, स्वबळावर , स्वसंरक्षणासाठी सक्षम होण्यासाठी समाजानेही पाठिंबा द्यावा, एवढीच अपेक्षा.

**लेखन संकलन**
**हेमकांत सोनार. रायगड-अलिबाग**
**९५११८८२५७८**

# पडघा बस स्थानकाची दूरावस्था

## प्रवाशांची सुरक्षा वाऱ्यावर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या व गावाकडून शहराकडे वाटचाल करणाऱ्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथील बस स्थानकाची दुरावस्था झाली असुन प्रवाशांची सुरक्षा रामभरोसे आहे.

पडघा हे ५० ते ६० खेडी पाडी गावांचे व्यापारी व विविध स्तरावरील केंद्र असल्याने विविध कामासाठी बाजारहाट करण्यासाठी हजारो नागरीक चाकरमानी, विद्यार्थी प्रवास करून बस स्थानकावर येत असतात तसेच मुंबई व उपनगरात तर कल्याण, भिवंडी, वांसीद, शहापुर जाण्यासाठी येथुनच प्रवास करत असतात सध्या पडघा येथुन कल्याण, भिवंडी, शहापुर, मध्य रेल्वेच्या स्टेशनकडे जाणारी खडवली या बसेस या ठिकाणावरून सुटत असतात त्यामुळे या ठिकाणी नेहमी वर्दळ असते या प्रवाशांना बसण्यासाठी पडघ्यात एक छोटेसे बस स्थानक असुन या बस स्थानकाची दुरावस्था झाली असुन या बस स्थानकाच्या छताला लाकडी बांबूचा आधार देण्यात आला असून अशा असुरक्षित बस स्थानकांत बसुन प्रवाशांना बसची वाट पहावी लागत आहे. तसेच एखाद्या प्रवाशांचा धक्का लागल्यास अपघात होण्याची शक्यता आहे त्यामुळे प्रवाशांच्यात नाराजी व्यक्त होत आहे. त्यामुळे प्रवाशांची सुरक्षा रामभरोसे असल्याचे विदारक चित्र येथे पहावयास मिळत आहे.

# मिक्सर ट्रकचा ब्रेक फेल : मोठा अपघात

## - आ. सौ. सुलभाताईंची घटनास्थळी भेट





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पूर्वेतील पुना लिंक रोडवर आज दुपारी एक भीषण अपघात झाला. सिमेंट मिक्सर ट्रकचा ब्रेक फेल झाल्याने ट्रकने टेम्पो व रिक्षाला जोरदार धडक दिली. या अपघातात तीन ते चार वाहनांचे मोठे नुकसान झाले असून, रिक्षाचालक रिक्षामध्ये अडकून गंभीर जखमी झाला. तसेच, इतर दोन ते तीन जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

घटनेची माहिती मिळताच माननीय आमदार सौ. सुलभाताई गणपत गायकवाड यांनी तत्काळ घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी तातडीने जखमींना रुग्णालयात दाखल करण्याची व्यवस्था करून त्यांच्या उपचारांविषयी चौकशी केली. सद्यस्थितीत दोन जखमी चैतन्य रुग्णालयात, तर तीन जण अमेय रुग्णालयात उपचार घेत आहेत. जखमींची प्रकृती स्थिर असली तरी त्यांना गंभीर दुखापती झाल्या असून, योग्य वैद्यकीय उपचारांची व्यवस्था करण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

सतत घडणाऱ्या अशा अपघातांमुळे वाहतूक पोलिसांनी पुणा लिंक रोड परिसरात विशेष लक्ष द्यावे, अशी सूचना आमदार गायकवाड यांनी केली. विशेषतः विजयनगर परिसरातील उताराच्या रस्त्यावर दोन मोठ्या शाळा – ज्ञानमंदिर व सम्राट स्कूल – असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे या उताराची पाहणी करून योग्य उपाययोजना करण्यासाठी महापालिकेकडे पत्र देण्याचा निर्णय आमदार गायकवाड यांनी घेतला आहे.

याशिवाय, या अपघाताला जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेशही त्यांनी प्रशासनाला दिले आहेत.

# जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत

# शहापूर तालुक्यात महाआरोग्य शिबीर संपन्न



## शिबिरात ९८९ लोकांची आरोग्य तपासणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत तालुकास्तरीय एक दिवसीय आरोग्य शिबिराचे आयोजन दि.०७ मार्च, २०२५ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, डोळखांब, तालुका शहापूर येथे करण्यात आला होता. आरोग्य शिबिराचे उद्घाटन रुग्ण कल्याण समिती सदस्य हरिभाऊ शिंदे व सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती शहापूर नंदकुमार डोहळे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी हरिभाऊ शिंदे मार्गदर्शन करताना म्हणाले की लवकर निदान झाले तर उपचार करणे देखील सुलभ होऊ शकते तसेच आजार होऊच नये म्हणून आहार योग्य प्रमाणात करण्याचे सांगितले. सर्वांनीच आयुष्यमान कार्ड काढून अत्यावश्यक प्रसंगी शासनाच्या योजनेचा फायदा घ्यावा, हे ही त्यांनी आवर्जून सांगितले. या शिबिरा करिता जिल्हास्तरावरून मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले तसेच पंचायत समिती शहापूर येथील गटविकास अधिकारी नम्रता जगताप यांची मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन मिळाले. या शिबिरासाठी तालुका अधिकारी डॉ. भाग्यश्री सोनपिंपळे या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या.

या तालुकास्तरीय शिबिरात एकूण 989 लाभार्थींना लाभ दिला गेला. त्यापैकी 463 पुरुष, 526 स्त्रियांचा सहभाग होता. स्त्रियांचे आजार 289, बालकांचे आजार 108, नाक कान घसा 42, दाताचे आजार 63, डोळयांचे आजार 393, मुखाचे आजार 11, त्वचा विकार 68, अस्थिरोग विकार 56, मानसिक रोग 16, मेंदूचे आजार 2, गोपाळकृष्ण चॅटींग ट्रस्ट आणि अनिल कॅन्सर क्लिनिक डोंबिवली यांच्याकडून ब्रेस्ट कॅन्सर साठीची मेमोग्राफी तपासणी 30 महिलांची करण्यात आली, आभा कार्ड 17, आयुष्यमान कार्ड-13 NCD आजार 208, प्रयोगशाळा तपासणी एकूण 288, मोफत चष्मे वाटप 310, ईसीजी 33, मोतीबिंदू 40, डोळ्याचे कायम अपंगत्व 2, तिरळेपणाचे 2 रुग्ण शोधण्यात आले. डॉ. अशोक नांदापूरकर, उपसंचालक मुंबई मंडळ ठाणे यांच्या बहुमूल्य मार्गदर्शनाखाली आणि प्राथमिक आरोग्य केंद्र, डोळखांब येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. रमेश राठोड, तसेच त्यांच्या सर्व वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी, गटप्रवर्तक, आशा स्वयंसेवका यांनी शिबीर यशस्वीरित्या संपन्न केले.या शिबिराकरिता न्यूरोलॉजिस्ट डॉ. दिलराज कडलस, बालरोग तज्ञ डॉ. श्याम राठोड, मुखरोग तज्ञ डॉक्टर स्वप्निल विसपुते स्त्री रोग तज्ञ डॉ. अविनाश बढीये, मानसरोग तज्ञ डॉ. रवींद्र तांबे, हृदयरोग तज्ञ डॉ. रोहित बोबडे, त्वचारोग तज्ञ डॉ. प्रशांत जावरे, कान नाक घसा तज्ञ डॉ. वैभव किरपण, अस्थिरोग तज्ञ डॉ. समीर शेलवले जनरल फिजिशियन डॉ. हिरामण साबळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल जाधव, डॉ. आर्यचाणक्य भोळे, डॉ. अभिजीत वानखेडे आदी उपस्थित होते.

# पालघर मध्ये बुद्धगया विहार मुक्तीसाठी बौध्द समाजाकडून निवेदन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : बिहार राज्यातील बुद्धगया येथे महाबोधी महाविहाराच्या मुक्ततेसाठी बौद्ध भिक्खू संघाने गेल्या २० ते २५ दिवसापासून आंदोलन सुरू केले असून त्या आंदोलनात अनेक बौद्ध भिक्खूंची तब्येत चिंताजनक असताना शासनाने आजपर्यंत कोणतीही ठोस निर्णय किंवा कारवाई केलेली नाही. यामुळे संपूर्ण जगभरात तीव्र संतापाची लाट उसळली असून नाराजीचा सूर आहे. सन १९४९ रोजी चे टेम्पल ॲक्ट अधिनियमन तातडीने सुधारणा करून संबंधित महाबोधी महाविहाराचे संपूर्ण व्यवस्थापन बौद्ध समाजाच्या हाती सोपविण्यात यावे. यासाठी पालघर जिल्ह्यात बहुजन समाज अन्याय अत्याचार संघर्ष समितीच्या वतीने पालघर येथील पाचबत्ती येथे सदर घटनेचा तीव्र निषेध करून निवेदन देण्यात आले.

यावेळी वरील विषयासंदर्भात निषेध करीत संबंधित विषय तातडीने मार्गी लावण्याकरिता पालघर जिल्ह्याच्या वतीने मा.महामहिम राष्ट्रपती महोदया, मा.महामहीम राज्यपाल महोदय ( महाराष्ट्र राज्य ), मा.मुख्यमंत्री (महाराष्ट्र राज्य), मा. मुख्यमंत्री (बिहार राज्य) यांना निवेदन जिल्हाधिकारी श्री गोविंद बोडके यांच्याकडे देण्यात आले. यावेळी रिपाई (आ ) चे पालघर जिल्हाध्यक्ष सुरेश जाधव, राष्ट्रीय पँथर संघटनेचे नेते अविष राऊत व त्यांचे पदाधिकारी , वंचित बहुजन आघाडीचे निलेश गावंडे व त्यांचे पदाधिकारी, भारतीय बौद्ध महासभेचे दत्तात्रेय जाधव, श्रीपाद शेलार, शामराव खरात, सिद्धेश जाधव, पालघर डहाणू तालुका बौद्ध युवक मंडळाचे विनोद मोरे, आप्पा लोखंडे, जगदीश जाधव, सामाजिक कार्यकर्ते छबिलदास गायकवाड, किरण जाधव,मिलिंद लोखंडे, विकास शेलार,सी. पी.एम.चे हर्षल लोखंडे रिपाईचे शरद जाधव,राम ठाकूर,राजू शेख, राजकुमार यादव, संजय पाटील, राजेश उपाध्याय, संजोग उपाध्याय,वर्षा उंबरठा, विमल चौधरी, तसेच समाज बांधवांसोबत विविध पक्ष, संघटनेचे कार्यकर्ते पदाधिकारी व शेकडो बहुजन बांधव उपस्थित होते.

# महिलांना भेडसावणाऱ्या आजारांवर डॉ. नेत्रा पाटील यांचे मार्गदर्शन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : आजच्या स्पर्धेच्या युगामध्ये महिलांना विविध समस्यांना आणि अडचणींना तोंड द्यावे लागत असताना देखील आजच्या काळातील महिलांनी मुलांबरोबर स्वतःची काळजी घ्यावी आणि विविध आजारांना आमंत्रण न देता सक्षम बनावे असे प्रभावी मार्गदर्शन डॉक्टर नेत्रा पाटील यांनी पेण येथे केले.





जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पेण एज्युकेशन सोसायटीची प्राथमिक शाळा पेण या प्रशाळेमध्ये महिला दिनानिमित्त शाळा व्यवस्थापन समिती, माता पलक संघ, शिक्षक शिक्षक पालक संघ सखी सावित्री या समितीतील सर्व महिला भगिनींना आमंत्रित करून महिलांचे विविध प्रश्न आणि महिलांना जाणवणाऱ्या विविध समस्या याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी प्रमुख पाहुण्या शाळेच्या माजी विद्यार्थिनी स्रीरोग तज्ञ डॉक्टर नेत्रा पाटील यांनी विशेष मार्गदर्शन केले. यावेळी लॅब असिस्टंट पुजा म्हात्रे उपस्थित होत्या.

सुरूवातीला राजमाता जिजाऊ आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शालेय विद्यार्थीनींनी आपल्या मनातील विविध प्रश्न घेऊन मुलाखतीच्या आधारे डॉ नेत्रा पाटील यांच्या सोबत हितगुज केले व जीवनाचा सार उलगडून घेतला.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.लेखा ठाकूर यांनी प्रास्ताविकात महिला दिनाचे महत्त्व सांगून आदर्श महिलांविषयी माहिती दिली. सहशिक्षिका रूचा परांजपे यांनी महिला दिन का व कशासाठी साजरा करावा तसेच आजची महिला अबला की सबला आहे याविषयी माहिती सांगितली. तर माता पालक संघ सदस्या जिजाबाई शिंदे यांनी आजची स्त्री कशी सक्षम व सामर्थ्यवान आहे तसेच कुटुंब नाती कशी सांभाळून ठेवायची याविषयी उत्तम रितीने सांगितले. प्रमुख पाहुण्या ,माता पालक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे मुख्याध्यापिका ठाकूर मॅडम यांनी गुलाब पुष्प देऊन सन्मानित केले.

महिला पालकांना मार्गदर्शन करताना डॉ.नेत्रा पाटील यांनी पुढे सांगितले की महिलांनी आपले वजन कमी करणे मासिक पाळी ,रोजचाआहार, व्यायाम पिसीओडीचा त्रास का व कशामुळे होतो कॅन्सरचे वाढलेले प्रमाण लहान मुलांचे खाण्याचे प्रमाण महिलांचे विविध आजार व त्यावर योग्य उपाययोजना कशी करावी ,वयात येताना होणारे शरिरातील बदल तसेच विविध अडचणी कशा सोडवाव्यात यासाठी मार्गदर्शन करून स्तनाचा कॅन्सर घशाचा कॅन्सर होण्याची लक्षणे कोणती यासह महिलांनी विविध समस्यांना तोंड कसे द्यायचे ,आपल्या जीवनात सकारात्मक बदल कसे घडवावे या बरोबरच शरिरातील वाढत जाणा-या विविध प्रकारच्या गाठी. आदि विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.माता पालकांनी विचारलेल्या प्रश्नांना सकारात्मक उत्तरे देऊन शंकांचे समाधान केले.सुत्रसंचलन कविता पेडणेकर तर आभार सुषमा साखरे यांनी केले.महिला दिन यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

# शेतकऱ्यांच्या जमिनीवर राष्ट्रीय महामार्गासाठी भूसंपादित : शेतकरी आक्रमक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : कल्याण- मुरबाड -माळशेज राष्ट्रीय महामार्ग ६१ च्या रुंदीकरणासाठी भूसंपादन विभागाकडून शेतकऱ्यांस कायदेशीर नोटीस न देता त्यांच्या जमिनीवर बेकायदेशीरपणे अतिक्रमण करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सदर शेतकऱ्यांचे प्रश्न समजून घेण्यासाठी गुरुवार ता.२७ फेब्रुवारी २०२५ मौजे वैशाखरे येथील सायबा हॉटेल या ठिकाणी तालुक्याचे आमदार सन्माननीय किसनजी कथोरे यांनी शेतकऱ्यांना एकत्र करून भूसंपादन प्रक्रियेतील सर्व प्रशासकीय प्राधिकारी प्रांत, मुरबाड तहसीलदार,राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पाच्या कार्यकारी प्रमुख व भूमी अभिलेख विभागाचे प्रमुख या सर्वांच्या समोर मौजे तळवली (बा.,) टोकावडे,वैशाखरे, बळेगाव या विभागातील सर्व बाधित शेतकऱ्यांनी राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन विभागाकडून होणाऱ्या बेकायदेशीर अतिक्रमणाबाबत विविध मागण्या मांडल्या.





शेतकऱ्यास भूसंपादन विभागाकडून जमीन अधिग्रहणाबाबत अधिकृत नोटीस मिळणे , भुमी अभिलेख विभागाकडून शेतकऱ्यांच्या जमिनीची फेरमोजणी करणे, समृद्धी महामार्गा प्रमाणे पाच पट भरपाई मिळणे, राष्ट्रीय महामार्गकडून जुनी वहिवाट दस्तऐवजावरून दाखविणे, अधिग्रहण होणारे भु -क्षेत्र व मिळणारा नेमका मोबदला याचे कायदेशीर पत्र रा. महा. व शासन यांच्याकडून शेतकऱ्यास मिळाल्याशिवाय कोणत्याही प्रकारचे बेकायदेशीर अतिक्रमण करू नये या मागण्या शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. अधिकारी वर्गाने शेतकऱ्यांना सकारात्मक आश्वासन दिले.

तालुक्याचे आमदार किसन कथोरे यांनी शेतकऱ्यांना अधिकाधिक भरपाई देण्याबाबत शासन दरबारी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

परंतु शेतकऱ्यांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार न करता दडपशाहीने दुसऱ्या दिवशी काम प्रकल्पाने सुरु केल्याने शेतकऱ्यांनी सदर कामास प्रतिबंध केला.

शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्याला वाचा फोडण्यासाठी तातडीने राष्ट्रवादी(शरदचंद्र )पक्षाचे नेते सुभाष पवार,शेतकरी सहकारी संघ मुरबाडचे माजी चेअरमन प्रकाश पवार ,माजी जिल्हा परिषद सदस्य सुभाष घरत व संजय पवार, मजूर फेडरेशन माजी चेअरमन बाळकृष्ण पवार,पंचायत समिती माजी सदस्य अनिल घरत,विलास घोलप,सुहास पवार,अभिजित पवार,रोहित बोराडे,मनिष कोयते, वसंत देशमुख,गुरुनाथ देसले,मनोज घरत व सर्व बाधित शेतकऱ्यांनी टोकावडे पोलीस स्टेशनचे सहाय्यक.पोलीस निरीक्षक दिनकर चकोर व तहसीलदार अभिजित देशमुख यांच्यापुढे वरील सर्व मागण्या मांडून काम बंद करण्याच्या सूचना दिल्या.

शेतकऱ्यांची भरपाई मिळाल्याशिवाय काम सुरू करू नये, बेकायदेशीरपणे काम सुरू केल्यास शेतकरी रस्त्यावर उतरून जन आंदोलन करतील असा इशारा शेतकऱ्यांनी दिला.याबाबत शासनाने दखल घ्यावी. तहसीलदारानीं सदर घटनेबाबत वरिष्ठांकडे शिफारस करून शेतकऱ्यांना न्याय देण्याचे आश्वासन दिले.शेतकऱ्यांनी मात्र शासन दरबारी न्याय मिळाल्याशिवाय आम्ही गप्प राहणार नाही असा इशारा शेतकऱ्यांच्यावतीने प्रकाश पवार व संजय पवार यांनी दिलेला आहे.

# इन्फिगो आय केअर हॉस्पिटल महिला दिन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शनिवार .८ मार्च २०२४ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त मुरबाड तालुक्यातील आशा सेविका आरोग्य सेविका तसेच सामाजिक राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांसाठी मोफत नेत्र तपासणी तसेच विशेष सन्मान अभियान आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरात जवळपास मुरबाड तालुक्यातील बहुसंख्य महिलांनी सहभाग नोंदवून उत्सुर्त प्रतिसाद दिला. शिबिरात सहभागी झालेल्या सर्व



महिलांना हॉस्पिटलच्या वतीने मोफत नेत्र तपासणी व विशेष उल्लेखनीय काम करणाऱ्या महिला तसेच महिला मंडळ असे सेविका यांचा सन्मान करण्यात आला.

या शिबिरात महिलांनी तसेच मुरबाड तालुक्यातील नामांकित शिवनेरी मल्टी स्पेशलिस्ट रुग्णालय येथील सर्व महिला कर्मचारी डॉक्टर आरोग्य सेविका यांनी सहभाग नोंदवून महिलांसाठी आयोजित केलेले शिबिराचे कौतुक केले ह्या शिबिराचे यशस्वी नियोजन इन्फिगो आय केअर हॉस्पिटल मुरबाड चे केंद्रप्रमुख रोहित झुंजारराव यांनी केले होते.




# महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /ठाणे : जागतिक महिला दिनानिमित्ताने दि.०७ मार्च, २०२५ रोजी पंचायत समिती कल्याण येथे महिलांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आला होता. शिबिराचे उद्घाटन पंचायत समिती कल्याण, गटविकास अधिकारी संजय भोये यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी कार्यालयात उपस्थित महिला अधिकारी व कर्मचारी यांना गुलाब पुष्प देऊन जागतिक महिला दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. शिबिरासाठी गटशिक्षणाधिकारी डॉ.रूपाली खोमणे, उप अभियंता बांधकाम सुदाम



महाडिक, सहाय्यक गटविकास अधिकारी रघुनाथ गवारी, कृषी अधिकारी बाळासाहेब शिंदे, तसेच पंचायत समिती येथील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरामध्ये पंचायत समिती कल्याण येथील सर्व महिलांची संपूर्ण आरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये सर्वांचे शुगर तपासणी, ब्लड प्रेशर तपासणी, स्त्री रोग तज्ञ यांच्याकडून तपासणी, रक्तगट तपासणी, Diabetes Profile, Lipid profile, liver Profile, Kidney Profile यासारख्या सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या करण्यात आल्या. तर 74 महिलांचे आभा कार्ड तयार करण्यात आले तसेच 22 लाभार्थ्यांना आयुष्यमान कार्ड तयार करून त्यांना गटविकास अधिकारी यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भारत मासाळ यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण आरोग्य कर्मचाऱ्यांनी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी उत्साह पुर्ण वातावरणात सहभाग नोंदविला.

संक्षिप्त

## पैशांचा पाऊस पडण्यासाठी पेण मधील नाडे गावाच्या स्मशानभूमीत अघोरी खेळ

• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : जलद गतीने श्रीमंत होण्याच्या हेतूने पेण तालुक्यातील ग्रामीण भाग असलेल्या नाडे गावात रात्रीच्या १ वाजण्याच्या वेळी स्मशानभूमी अघोरीविद्या तंत्रमंत्र करत नारळ, लिंबू, टाचणी खिळे, हळद, अबीर गुलाल तसेच पांढरे, रंगीत बस व मानवी कवटी ठेवून काही इसम स्मशानभूमीत फेल्या मारत अघोरी विद्या करत असल्याचे ग्रामस्थांना दिसून आल्याने एवढ्या काळोख रात्रीत स्मशानभूमीत काय चालले आहे हे ग्रामस्थांनी जाऊन पाहिल्यावर ग्रामस्थांना काहीतरी विचित्र प्रकार हे इसम करत असल्याचे दिसून आले.

यानंतर ग्रामस्थांनी त्यांना विचारले असता यातील इसमांनी स्मशानभूमीतून पळण्याचा प्रयत्न केला. मात्र ग्रामस्थांनी त्यांचा पाठलाग करून यातील दोघांना पकडून ठेवले आणि पोलिसांना खबर देऊन पोलिसांच्या ताब्यात त्यांना देण्यात आले. ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे नाडे गावातील स्मशानभूमीत पैशाचा पाऊस पाडण्यासाठी सुरू असलेली अघोरी धडपड ग्रामस्थांच्यामुळे आणून पाडण्यात आली. यावेळी पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी नाडे आदिवासी वाडीवर जाऊन स्मशानभूमी परिसराची पाहणी केली. त्यावेळी त्यांना स्मशानभूमीत अघोरी विद्या करण्यासाठी तसेच तंत्र मंत्र विद्याला लागणारे साहित्य तसेच मानवी डोक्याची कवटी ठेवलेली दिसून आली. यानुसार पेण पोलीस ठाण्यात सदरच्या इसमांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस करत आहेत.

## तापत्या उन्हात पशु-पक्ष्यांसाठी 'पाखी निसर्ग फाऊंडेशन'चा जीवनदायी प्रयत्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : कल्याण : वाढत्या उष्णतेचा फटका मानवासोबतच पशु-पक्ष्यांनाही बसत असून, अनेक पक्षी आणि प्राणी पाण्याविना तडफडत आहेत. या पार्श्वभूमीवर 'पाखी निसर्ग फाऊंडेशन'ने पुढाकार घेत, पाणी आणि निवाऱ्यांची व्यवस्था करून निसर्गातील जीवांसाठी जीवनदायी प्रयत्न सुरू केला आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रितेश कांबळे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबवला जात आहे.उन्हाच्या झळांपासून पक्ष्यांना वाचवण्यासाठी झाडांवर, सोसायट्यांमध्ये आणि सार्वजनिक ठिकाणी मातीच्या किंवा सिमेंटच्या पाणपात्रांची व्यवस्था केली जाणार आहे. नागरिकांनीही आपल्या घरासमोर किंवा गच्चीवर पक्ष्यांसाठी पाणी ठेवावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सार्वजनिक बागांमध्ये आणि मोकळ्या जागांमध्ये पक्ष्यांसाठी सुरक्षित निवारे उभारले जाणार आहेत.

वृक्षारोपण हे केवळ प्रतिकात्मक राहू नये, तर लावलेली झाडे जगवण्यावर भर दिला पाहिजे. अनेक सरकारी योजना आणि सामाजिक उपक्रमांतर्गत झाडे लावली जातात, मात्र ती टिकवण्यासाठी प्रयत्न अपुरे पडतात. परिणामी निसर्गाचा समतोल बिघडतो. याला आळा घालण्यासाठी 'पाखी निसर्ग फाऊंडेशन' सोशल मीडिया, वृत्तपत्रे आणि प्रत्यक्ष जनसंपर्काद्वारे जनजागृती करत आहे. याशिवाय, उष्णतेमुळे आजारी पडणाऱ्या आणि निर्जलीकरण झालेल्या पक्ष्यांसाठी वैद्यकीय मदतीचीही व्यवस्था केली जाणार आहे. पशुवैद्यकीय तज्ज्ञांच्या मदतीने गरजू प्राण्यांना औषधोपचार दिले जातील.

निसर्ग हा फक्त झाडे आणि जंगलांपुरता मर्यादित नाही, तर त्यात प्राणी, पक्षी आणि छोटे जीवसुद्धा महत्त्वाचे घटक आहेत. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारी घेतली पाहिजे, असे आवाहन 'पाखी निसर्ग फाऊंडेशन'च्या वतीने करण्यात आले आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी संपर्क: 7977323630

## सन २०२२-२३ या वर्षासाठीचे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार घोषित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /ठाणे : सन 2022-23 या वर्षासाठीचे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार प्रत्येक महसूल विभागातून एक याप्रमाणे राज्यातील सहा महिलांना प्रदान करण्यास शासन मान्यता आली आहे. त्यानुसार कोकण विभागातून सीवूड्स, नेरुळ, नवी मुंबई येथील श्रीमती फुलन जोतीराव शिंदे यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. लवकरच हा पुरस्कार प्रदान करण्याची कार्यवाही संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत करण्यात येणार आहे.

## नरेंद्र पवार फाऊंडेशनमार्फत शालेय विद्यार्थ्यांना मिळणार स्वसंरक्षणाचे धडे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : गेल्या काही महिन्यांत घडलेल्या घटनाक्रम पाहता सध्याच्या काळात शालेय विद्यार्थ्यांना अनेकविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शारीरिक तंदुरुस्तीसह स्वसंरक्षणाची जाणीव निर्माण करण्यासाठी भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या संकल्पनेतून कल्याणातील शालेय विद्यार्थ्यांना आता स्वसंरक्षणाचे धडे दिले जाणार आहेत. आजच्या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने नरेंद्र पवार फाऊंडेशनमार्फत कल्याण पश्चिमेतील शशांक बालविहार शाळेपासून या निःशुल्क उपक्रमाचा प्रारंभ करण्यात आला.

गेल्या काही काळामध्ये झालेल्या सामाजिक बदलांचा शालेय विद्यार्थ्यांच्या मनावर अतिशय नकारात्मक परिणाम जाणवत आहे. त्यातच आपली



### जागतिक महिला दिनी उपक्रमाला सुरवात

बदललेली जीवनशैली, पौष्टिक आणि सात्विक आहाराऐवजी फास्ट फूडच्या भडिमारात या शालेय विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तसेच मानसिक आरोग्यावर झालेले विपरीत परिणाम दिसू लागले आहेत. आणि हेही कमी म्हणून की काय शालेय विद्यार्थी आणि विद्यार्थिनींवर वाढलेल्या अत्याचाराच्या घटनांनी संपूर्ण पालक वर्गामध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. नेमका हाच धागा पकडून माजी आमदार नरेंद्र पवार यांनी आपल्या नरेंद्र पवार फाऊंडेशनच्या माध्यमातून या परिस्थितीमध्ये बदल करण्याचा विडा उचलला आहे. त्याचाच एक भाग म्हणून शालेय विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक - मानसिक आत्मविश्वास निर्माण करून त्यांच्यामध्ये स्वसंरक्षणाची जाणीव जागृत करण्यासाठी मोफत स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. नरेंद्र पवार फाऊंडेशनच्या माध्यमातून कल्याण पश्चिमेतील विविध शाळांमध्ये हा उपक्रम राबविला जाणार असून त्यामध्ये कराटे, दांड पट्टा, तलवारबाजीसोबतच सूर्य

### कराटे, दांड पट्टा, तलवारबाजीसह दंड आणि सूर्य नमस्काराचे शिक्षण

नमस्कार, दोरीच्या उड्या आदींचे तज्ज्ञ व्यक्तींमार्फत प्रशिक्षण देण्यात येणार असल्याची माहिती माजी आमदार नरेंद्र पवार यांनी दिली.

आज कल्याणच्या शशांक बालविहार शाळेपासून या उपक्रमाचा प्रारंभ झाला असून कल्याण पश्चिमेतील तब्बल 150 शाळांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. तर 15 शाळांमधील 700 हून अधिक विद्यार्थ्यांनी या उपक्रमासाठी नोंदणी केली असल्याचेही पवार यांनी यावेळी सांगितले. यावेळी या विद्यार्थ्यांना दांड पट्टा, दंड आणि तलवार या शस्त्रांची माहिती देण्यासह त्यांचे प्रात्यक्षिकही सादर करण्यात आले.

## स्वाधार फिन एक्सेसचे ग्रामीण भाग आर्थिक साक्षरता अभियान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर :बदलत्या डिजिटल युगात ग्रामीण भागातील नागरिकांना डिजिटल आर्थिक व्यवहार कसे करावेत या संदर्भात समुपदेशन आणि जनजागृती करिता स्वाधार फिन एक्सेस मोठ्या प्रमाणात अभियान राबवत आहे.या संस्थेची कार्यकर्ते ग्रामीण भागात जाऊन अल्पशिक्षित व अशिक्षित नागरिकांना योग्य डिजिटल आर्थिक व्यवहार कसे करावेत याचे प्रशिक्षण देताहेत. यास ग्रामीण भागातून उत्स्फूर्त असा प्रतिसादही प्राप्त होतोय. भारतीय रिझर्व्ह बँके द्वारे अर्थिक साक्षरता अभियान देशभरात सुरू आहे. विशेषतः जागतिक महिला दिनाच्या औचित्याने हा उपक्रम स्त्रियांपर्यंत पोहोचवला जातोय. ' "' वित्तीय समझदारी, समृद्ध नारी ' या संकल्पनेवर आधारित आहे. जो कल्याण, अंबरनाथ, उल्हासनगर च्या ग्रामीण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात साजरा होतोय.

यात मनीवाईज अर्थिक साक्षरता केंद्र, अंबरनाथ



### ' वित्तीय समझदारी, समृद्ध नारी ' अंतर्गत महिला होतायत, डिजिटल आर्थिक साक्षर ....

जिल्हा ठाणे , बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या मदतीने कल्याण ब्लॉक मधील दहागाव , चौरे गावामध्ये या शिबिरांचे आयोजित सुरू आहे. याद्वारे गावातील सर्व कुटुंबांना अर्थिक साक्षरतेचे प्रशिक्षण दिले जातेय. जेणेकरून, फसवणूक आणि त्याची तक्रार निवारण प्रणाली, डिजीटल बँकिंग, सिबिल स्कोअर वाढवणे ,तसेच विविध सरकारी योजनांची माहिती, प्रधानमंत्री जीवन ज्योत विमा, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना, सुकन्या समृद्धी योजना विषयींची माहिती देण्यात आली. या सुविधांचा स्वाधार मेळाव्याच्या माध्यमातून सहभागीच्या कुटुंबांना सुविधाचे फॉर्म भरून देण्यात आले.

या कार्यक्रमात प्रतिभा बांधणे, महाराष्ट्र ग्रामीण Trendy बँकेच्या कर्मचारी ,भाग्यश्री कलमकर व जिल्हा समन्वयक सोनाली स्थूल स्वाधार फिनएक्सेस टीम चे सी एफ एल इन्चार्ज अश्विनी इनकर, प्रशिक्षक अर्चना प्रसाद व स्वाधार ची टिम आदी उपस्थित होते.

## कल्याण ग्रामीणमध्ये शेतकरी कुटुंब भयभीत | महिला पोलिसांना धक्काबुक्की

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण ग्रामीण मध्ये धक्कादायक प्रकार समोर आला असून काही महिलांनी शेतकरी कुटुंबाला धमकावले आहे, तर पोलिसांना सुद्धा धक्का बुक्की केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील देसाई गावांत एका जागेवरून शेतकरी कुटुंब आणि व्यावसायिक यांच्यात वाद सुरू आहे. हे प्रकरण कोर्टात सुद्धा गेले आहे. यातच गेले काही दिवस पन्नास ते साठ परप्रांतीय महिला या जागी येऊन शेतकरी कुटुंबाला धमकावत, शिवीगाळ करत त्रास देत आहेत. या शेतकरी कुटुंबाने टोल फ्री नंबरवर पोलिसांनी हि बाब कळविली. पोलीसांनी घटनास्थळी येऊन त्या परप्रांतीय महिलांना जाण्यास सांगितले मात्र त्या महिलांनीं पोलिसांशी अरेरावी करत महिला पोलिसांना धक्का दिला. याचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड वायरल झालाय. या घटने बाबत शेतकरी कुटुंबियांना विचारले असता सदर महिलां या व्यावसायिकाने पाठविल्या होत्या. तसेच या जागेचे प्रकरण कोर्टात असून आम्ही याबाबत पोलिसांना कळविले आहे. मात्र पोलिसांनी त्या महिलांवर कोणताही गुन्हा दाखल केला नाही. या परप्रांतीय माहिलांमुळे आमच्या कुटुंबातील महिला, मुले घाबरली आहेत. तसेच बाजूच्या इमारतीतील नागरिकांना सुद्धा याचा त्रास होत आहे.

पोलिसांनी या महिलांवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी शेतकरी कुटुंबाने केली आहे. या कुटुंबीयांना न्याय मिळत नासल्याने त्यांनी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सचिव संतोष केणे यांच्याकडे धाव घेतली आणि हा प्रकार सांगितला. यानंतर केणे यांनी आगरी कोळी भूमिपुत्र महासंघतील पदाधिकारी आणि शेतकरी कुटुंबियांना घेऊन थेट डायघर पोलीस स्टेशन गाठले. आणि पोलिसांकडे सर्व प्रकाराबाबत वाचा फोडली. यानंतर पोलिसांनी हा प्रकार तपासून आम्ही पुढील कारवाई करू असे आश्वासन दिले.

तर *" हि गुंडगिरी चालली आहे आणि ती चुकीची आहे ती आमच्या भूमिपुत्रांवर झाली आहे. या ठिकाणी गावाबाहेरील महिला व्यावसायिकांनी आणल्या असतील तर आमच्या पंचक्रोशीतील भूमिपुत्र एकवटले तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर पोलिसांनी काय करायचं ? मुडदे पडल्यानंतर पोलीस पंचनाम्याला येणार का ? आमचं संरक्षण कोण करणार ? या ठिकाणी सुरु असलेला हा नंगानाच बंद झाला पाहिजे. त्या शेतीला संरक्षण भिंत असताना त्यांच्यावर ट्रेस पासचा गुन्हा दाखल केला पाहिजे. आमच्या जागेत त्यांनी संरक्षण भिंत तोडून प्रवेश केला आहे हा कायदा आहे. आम्ही संविधान मानतो. या ठिकाणी जर पुन्हा भूमिपुत्रावर अन्याय होत असेल तर या विभागाचे भूमिपुत्र रस्त्यावर उतरले तर सर्व जबाबदारी पोलिसांची राहील. आमदार खासदारांची जबाबदारी काय आहे ? निवडणुका झाल्या मतदान संपलं मतदारराजाला धक्काबुक्की करायची आपण वाट पाहत आहेत ? काम काय आहे अधिवेशन सुरु आहे न्याय मिळाला पाहिजे प्रश्न सुटला पाहिजे असे परखड मत काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सचिव संतोष केणे यांनी व्यक्त केले.*



" ज्या वेळेस हा प्रसंग घडला त्यावेळी कायद्याच्या चौकटीत राहून हाताळावा म्हणून आम्ही ११२ नंबर वर संपर्क केला होता. कि इथे काही अनुचित प्रकार घडू नये. हा प्रकार आम्ही जेव्हा संपर्क केला तेव्हा काही महिला पोलीस कर्मचारी आणि पुरुष पोलीस कर्मचारी घटनास्थळी आले होते. सदर महिला या महिला पोलिसांच्या अंगावर देखील धावून जात होत्या. त्यावेळी माझ्या पक्षकारांनी संबंधित महिलांचे चित्रीकरण देखील केलं असून त्यात स्पष्ट दिसत आहे कि , त्या महिला एवढ्या रागीट होत्या की त्या महिला पोलिसांच्या देखील अंगावर धावून जात होत्या. तर साधारण शेतकरी त्यांच्यासमोर काय करणार. " अशी प्रतिक्रिया ॲड आशिष पाटील यांनी दिली.

### मुडदे पडल्यानंतर पोलीस पंचनाम्याला येणार का ? काँग्रेस नेते संतोष केणे यांचा सवाल

या प्रकाराबाबत शीळ डायघर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीपान शिंदे यांना विचारले असता, त्यांनी सांगितले की, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता2023 चे कलम 168 प्रमाणे आम्ही दोघांनाही नोटीस पाठवली असून शांतता व सुव्यवस्था राखण्यास सांगितले आहे. मात्र पोलिसांनी याबाबत कॅमेरा समोर बोलण्यास नकार दिला आहे. दरम्यान पोलीस आता त्या परप्रांतीय महिलांवर गुन्हा दाखल करणार का आणि त्यांना अटक करणार का असा सवाल उपस्थित होत आहे.

## केंद्र शासनाची हमीभाव धान्य योजना आर्थिक संकटात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : केंद्र शासनाकडून आधारभूत हमीभाव धान्य खरेदी योजना देशात सुरू आहे. ! परंतु केंद्र शासनाकडून सहकारी संस्थांना हमाली व संस्थांना मिळणारे कमिशन व गोडांचे भाडे गेल्या दहा वर्षापासून मिळत नसल्यामुळे वरील योजनेच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे धान खरेदी योजना सुरू आहे. शेतकऱ्यांना वेळेवर त्यांचे पेमेंट मिळत नाही विशेष म्हणजे खरेदी केंद्रावर काम करणारे हमाल यांची हमाली सुद्धा वेळेवर मिळत नाही त्यामुळे कित्येक वेळेला हमाल मिळत नसल्याने भात खरेदी बंद पडली आहे.

महाराष्ट्रातील संस्थावर मिळणारे कमिशन गेल्या दहा वर्षापासून कमिशन कोट्यावधी रुपयाचे कमिशन मिळाले नाही तसेच संस्थांनी घेतलेले धान साठवण्यासाठी घेतलेले



गोडावनचे भाडे दहा ते बारा वर्षे मिळाले नाही. त्यामुळे वरील संस्थांना काम करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणात आर्थिक अडचण निर्माण झाले आहे. विशेषता केंद्र शासनाने धान साठी भाड्यात घेतलेल्या गोडावन मध्ये पाच वर्षे राहिले तरी,, दोनच भाडे दिले जाते. त्यामुळे महाराष्ट्रात या योजनेसाठी कोणालाही गोडाऊन मालक देण्यास तयार होत नाही त्यामुळे धान्य साठवण्यासाठी सुद्धा अडचण निर्माण होत आहे. केंद्र शासनाकडून सुरू असलेली वरील योजना महाराष्ट्र सरकारकडून आदिवासी विभागातील शेतकऱ्यांसाठी आदिवासी महामंडळ एजंट म्हणून काम पाहत आहे व बिगर आदिवासी विभागातील शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्रातील मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई हे काम पाहत आहे. वरील सर्व आर्थिक अडचणीसाठी मार्केटिंग फेडरस फेडरेशनचे एमडी व महाराष्ट्र राज्य अन्न नागरी पुरवठ्याचे सचिव यांच्याशी अनेक वेळा फोनवर चर्चा करून, प्रत्यक्ष भेटून, पत्र्यावर करून अद्याप पर्यंत मार्ग सुटला नाही. त्यांचे म्हणणे असे की केंद्र शासनाकडून हमाली, कमिशन ,व गोडवांचे भाडे यांच्या पैसे वेळेवर मिळत नाही त्यामुळे आम्हाला पैसे देता येत नाही. ठाणे जिल्ह्यात नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व संस्था आर्थिक अडचणीत सापडल्या आहेत.

वरील अडचणीतून मार्ग काढण्यासाठी ५ मार्च २०२५ रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दालनात माजी आमदार गोटीरामभाऊ पवार यांनी भेट घेऊन लेखी पत्र देऊन केंद्र शासनाकडून वरील योजनेसाठी निधी तात्काळ आणण्यासाठी आपण प्रयत्न करावे, तसेच राज्याचे दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेण्याचे प्रयत्न केले परंतु ते बाहेर असल्याने त्यांची भेट होऊ शकली नाही त्यांचे स्वीक सहाय्यक त्यांच्याकडे वरील योजना संदर्भात लेखी पत्र देऊन त्यांनाही योजनेची आर्थिक अडचण दूर करण्यासाठी प्रयत्न करावे अशी माहिती माजी आमदार गोटीरामभाऊ पवार यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

## मुरबाडची शामली जाधव भारतीय सैन्यदलात लेफ्टनंट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मन के जिते जीत है, मन के हारे हार! हार गये जो बिन लढे,उन पर है धिक्कार ! या पंक्तिला तंतोतत धरून एक अतिशय धाडसी कामगिरी करत मुरबाड तालुक्याची रणरागिणी कु.शामली विजय जाधव हिने भारतीय सैन्यदलात भरती होऊन खडतर अशी ट्रेनिंग पुर्ण करून ती लवकरच मायभूमी मुरबाड मध्ये येत आहे.लहानपणीच वडिलांचे छत्र हरपलेली शामली स्वतः उच्च शिक्षित पदवीधर असून खाजगी क्षेत्रात कुठेही तिला लठ्ठ पगाराची नोकरी मिळाली असती परंतु देशसेवेची आवड मनात होती आणी ती सैन्यात भरती झाली. ट्रेनिंग साठी बिहार राज्यात असताना तेथिल खडतर अशी ट्रेनिंग तिने यशस्वी रित्या पुर्ण केली आहे.त्यामुळे गया येथे 6 व 8 मार्च 2025 रोजी होणाऱ्या पासिंग आऊट परेड मध्ये शामलीच्या कुटुंबाला सहभागी होण्याचे निमंत्रण मिळाले आहे. समस्त मुरबाडकरांसाठी ही अभिमानास्पद बाब असून तिचे जाधव कुटूंब हा सुखद व अभिमानाचा क्षण पाहण्यासाठी बिहार मधिल गया येथे गेले आहेत. शामलीने केलेल्या कामगिरीचे निश्चितच ठाणे जिल्हासह मुरबाड तालुक्यात जोरदार कौतुक व अभिनंदन होत असून तिने जागतिक महिला दिना निमित्त तरूण ,तरूणींना मोठी प्रेरणा व स्फूर्ती दिली आहे.






'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024